पैगंबर मुहम्मद (स.) यांचा शत्रूंशी व्यवहार

लेखक

मुहम्मद फारूक़ खान

भाषांतर

सय्यद ज़ाकिर अली

"अल्लाहच्या नावाने जो असीम कृपावंत व परम दयावंत आहे"

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याविषयी कुरआनात म्हटले आहे,

"(हे पैगंबर!) आम्ही (अर्थात ईश्वराने) तुम्हाला समस्त विश्वाकरिता दया, कृपा बनवून पाठविले आहे." (दिव्य कुरआन, २१:१०७)

कुरआनातील या पैगंबर मुहम्मद (स.) यांचा विशेष परिचय देणाऱ्या आयतीवरून स्पष्ट होते की त्यांना पैगंबरपदावर नियुक्त करण्याचा वास्तविक उद्देश असा की या समस्त सृष्टीमध्ये ईश्वराच्या दया आणि अनुकंपेचे पूर्णपणे दर्शन घडावे आणि असे होता कामा नये की सृष्टीतील प्रत्येक वस्तुपासून मानवजातीस लाभ मिळावा मात्र ईश्वराच्या दया आणि विशेष कृपेपासून ती वंचित राहावी.

ही बाब मुळीच विसरता कामा नये की सृष्टीतील उपलब्ध असलेल्या भौतिक गरजांच्या पूर्तीसाठी असलेल्या आवश्यकतांपेक्षाही जास्त महत्त्वपूर्ण असलेली ईशकृपा आणि अनुग्रह म्हणजे आत्मिक क्षेत्रातील मानवी आवश्यकतांची पूर्तता होय. मानवास केवळ शरीरच नसून आत्मादेखील आहे. म्हणजेच शारीरिक गरजांप्रमाणेच मानवाच्या आत्मिक गरजांची पूर्तताही आवश्यक आहे. अध्यात्माचा सखोल अभ्यास केल्यास ही बाब स्पष्ट होते की वस्तुत: मानव म्हणजे केवळ शरीर नसून तो शरीर आणि आत्म्याचा एक संच आहे. म्हणून शरीराप्रमाणेच आत्म्याच्याही काही विशेष गरजा असतात, तसेच आत्म्याची एक सर्वात महत्त्वाची आणि विशेष गरज अशी की त्यास त्याच्या अस्तित्वाचा एखादा उच्च आणि स्थायीस्वरुपाचा आशय प्राप्त व्हावा. आत्माशिवाय त्याची मानवी जीवनात कोणतीही सार्थकता आणि अर्थ शिल्लक राहात नाही. ज्याप्रमाणे भुकेल्या आणि तहानलेल्या शरीरास अन्न-पाण्याची गरज असते आणि अन्न-पाण्याचा शोध सुरु होतो. अन्न-पाणी एकदाचे मिळाले की भूक-तहान मिटून जाते. त्याचप्रमाणे भुकेल्या आणि तहानलेल्या आत्म्यास अध्यात्मिक ज्ञानाची गरज असते. याशिवाय आत्म्याची एक अभिव्यक्ती असते आणि या अभिव्यक्तीची पूर्तता नैतिक-आचरणाद्वारे होते. नैतिक गुण आणि नैतिक मान्यतांना जे महत्त्व प्राप्त आहे, त्याच्या वास्तविक कारणापासून साधारणत: लोक अनभिज्ञ आहेत. नैतिक गुण आणि नैतिक व्यवहाराच्या माध्यमाने आत्म्याची कोमलता आणि सौंदर्य व्यक्त होत असते. नैतिकतेचा जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राशी व्यापक संबंध असतो. मग हे क्षेत्र सामाजिक असो, राजकीय असो की आर्थिक असो, कोणत्याही क्षेत्रातून नैतिकतेचा बहिष्कार करणे हे अक्षम्य

अपराध आणि घोर अन्याय होय.

सामान्यत: लोक आपल्या शरीरापुरतेच पाहतात, म्हणून त्यांना शारीरिक गरजाच जास्त स्पष्ट दिसत असतात आणि शारीरिक गरजा पूर्ण करून इंद्रिय सुखाचाच तेवढा अनुभव मात्र घेत असतात. त्यांना जाणीवच नसते की, फक्त इंद्रिय सुखातच सर्वकाही नसून आत्म्याद्वारे माणसाला जी सुख-शांती आणि तृप्ती व तुष्टता मिळते. तिची इतर कोणत्याही सुख-शांतीशी तुलना होणे शक्य नाही. आत्म्याद्वारे माणूस तृप्तीच्या परमोच्च शिखरावर पोचून जीवनास मुग्धमय बनवितो आणि या अवस्थेत जीवनातील सर्व प्रकारची कटुता नष्ट होते.

इस्लामने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नैतिकतेलाच मूळ आधार ठरविला आहे. नैतिकतेचा संबंध कोणत्याही एकाच क्षेत्राशी नसून प्रत्येक क्षेत्राशी असतो. नैतिक आचरणाच्या माध्यमानेच जीवनामध्ये आत्म्याचे दर्शन घडते आणि त्याचा विकाससुद्धा होत असतो. आत्म्याच्या या दर्शनामुळे अथवा अभिव्यक्तीमुळेच सज्जनता, सुशीलता, सदाचार आणि मृदुभाषिता वगैरेमध्ये एक प्रकारे अलौकिक सौंदर्याची जाणीव होते.

वर ही गोष्ट स्पष्ट करण्यात आली आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पैगंबरत्वाचा वास्तविक उद्देश हा ईशदया व कृपेचे सृष्टीमध्ये प्रदर्शन होय. याच उद्देशाच्या पूर्ततेस्तव पैगंबर मुहम्मद (स.) यांना पैगंबरपदावर आरूढ करण्यात आले. मानवाच्या मार्गदर्शनाची जी महानतम सेवा त्यांनी केली, त्यातून ईशदया आणि कृपेचे स्पष्ट दर्शन होते. ज्याप्रमाणे अल्लाह समस्त मानवांवर दया व कृपा करतो आणि त्यात कोणत्याही प्रकारचा वर्ण, वंश, भाषा, राष्ट्र अथवा जातीवर आधारित भेदभाव करीत नाही, त्याच सर्व विश्वासाठी पालनकर्ता, कृपा आणि दया असलेल्या ईश्वराने आपली ही नि:पक्ष दया विश्वातील समस्त मानवजातीत प्रदर्शित करण्यासाठीच पैगंबर मुहम्मद (स.) यांना समस्त मानवजातीसाठी दया आणि कृपा बनवून पाठविले आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांची शिकवण करुणा व दयासुद्धा कोणताही भेदभाव न बाळगता संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी आहे आणि याच कार्याची पूर्तता करण्यासाठी त्यांना ईश्वराने पैगंबरत्व प्रदान केले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मार्गदर्शनपर शिकवणी केवळ मित्रांच्या आणि आपले समजण्यात येणाऱ्यांच्याच प्रति प्रेमळ व दयापूर्ण व्यवहाराच्या नसून अगदी शत्रुबरोबरसुद्धा त्यांनी न्यायपूर्ण आणि सदाचारी व्यवहाराच्या शिकवणी दिल्या आहेत. पैगंबर मुहम्मद (स.) यांचा खरा परिचय करून देताना कुरआनाने म्हटले आहे,

"हे पैगंबर (स.) भलाई आणि दुष्टता एकसमान नाहीत. तुम्ही दुष्टतेचे त्या भलाईद्वारे निरसरन करा जी अत्युत्तम असेल. तुम्ही पाहाल की ज्याच्याशी तुमचे शत्रुत्व होते, तो जीवलग मित्र बनला आहे." (दिव्य कुरआन, ४१:३४)

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी विश्वाच्या आणि जग अस्तित्वात असेपर्यंतच्या समस्त मानवांना कोणताही भेदभाव न पाळता समान रूपाने सत्यधर्माचा परिचय करून देण्याचे महान कर्तव्य पार पाडले. यात त्यांनी आपला-परका, मित्र-शत्रू असा मुळीच भेदभाव केला नाही. याशिवाय पैगंबरांनी असेही सूचित केले की नेकी, चांगुलपणा आणि भलाई व सदाचाराच्या कार्यात सर्वांचीच मदत करावी. त्याचप्रमाणे अन्याय व अत्याचाराच्या आणि दुष्कर्माच्या कार्यात कोणाची आणि कितीही जवळच्या माणसाचीही मुळीच गय न करता कोणत्याही प्रकारे मदत करू नये. कुरआनात ही बाब अशा शब्दांत सादर करण्यात आली आहे,

"जे कार्य पुण्याईचे व ईशपरायणतेचे आहे, त्यामध्ये सर्वांशी सहकार्य करा आणि जी पाप व अत्याचारांची कामे आहेत, त्यात कोणाशीही सहकार्य करू नका."

(दिव्य कुरआन, ५:२)

एके प्रसंगी आदरणीय पैगंबर मुहम्मद (स.) यांनी अगदी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे,

"ईश्वराने मला केवळ एवढ्यासाठीच पाठविले आहे की मी नैतिक गुणांना त्यांच्या परमोच्च स्थानावर पोचवावे आणि या कार्यात मी कोणतीही कसर बाकी ठेवू नये." (हदीस ग्रंथ)

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी रंजल्या-गांजल्यांना उराशी कवठाळले, बुडत्याला सहारा दिला, ठेचाळणाऱ्यास हात दिला, अन्याय व अत्याचारपीडिताच्या हाकेवर धावून गेले, शोषित, पीडितांना प्रत्यक्ष न्याय मिळवून दिल्यावरच श्‍वास घेतला, समाजाच्या कृत्रिम परंपरा आणि पुरुषीय अहंकाराच्या जुलुमी विळख्यातून स्त्रियांची फक्त सुटकाच केली नसून त्यांना मान-सन्मान आणि प्रतिष्ठेच्या शिखरावर विराजमान केले. शिवाय लोकांना सक्तीने बजावले की त्यांच्या अधिकारांची पायमल्ली खपवून घेतली जाणार नाही. या ठिकाणी त्यांच्या सर्वच महान कार्याचा लेखा-जोखा सादर करण्याची संधी नाही. केवळ एवढेच पाहायचे की इतरांना आणि शत्रूंनादेखील दया व कृपेची छत्रछाया असलेल्या या महान आत्म्याचा शत्रुप्रति व्यवहार कसा होता. या व्यवहारातही किती करुणा, ममत्व आणि सहानुभूती होती.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचा शत्रूंप्रति व्यवहार

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करताना एक गोष्ट अगदी प्रखरपणे जाणवते आणि ती म्हणजे पैगंबरांनी त्यांच्या कोणत्याही शत्रूशी वैयक्तिक बदला घेतला नाही, कोणत्याही प्रकारे सूड उगविला नाही. पैगंबर मुहम्मद (स.) यांना पैगंबरत्व मिळाले आणि त्यांच्यावर विरोधकाकडून अन्याय, अत्याचार आणि निष्ठूरतेचे पर्वत कोसळले. इतिहासात कधीही न दिसणारा अन्याय व अत्याचार पैगंबर मुहम्मद (स.) आणि त्यांच्या अनुयायांवर व जवळच्या नातलगांवर करण्यात आला. त्यांना घर, परिवार आणि मायभूमी त्यागण्यासाठी विवश केले, त्यांच्या हत्येचा कट रचण्यात आला, आपली प्रिय मायभूमी अर्थात मक्का शहर त्यागून मदीनेस प्रस्थान करण्यास भाग पाडले. मदीना शहरी जाण्यापूर्वी पैगंबरांचा जीव काबागृहात अडकलेला होता. जाताना दर्शन घेण्याची त्यांची तीव्र इच्छा होती. मात्र विरोधकांकडून अन्याय व अत्याचारांमुळे काबागृहाचे दार त्यांच्यासाठी बंद करण्यात आले. काबागृहाच्या विश्वस्ताने काबागृहाच्या दर्शनासाठी दरवाजाच्या चाव्या देण्यास नकार दिला. मात्र इतिहास साक्षी आहे की ज्यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांना काबागृहाच्या अंतिम दर्शनासाठी चावी देण्यास नकार दिला होता, मक्केवर जबरदस्त विजय मिळविल्यावर पैगंबरांनी त्यांच्यावर सूड न उगविता त्यांच्याच हाती चावी दिली. एवढेच नव्हे तर दयाळू व कृपाळू पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांना आशीर्वाद दिला की ही चावी त्यांच्याच वंशात असेल. हे इतिहासातील अप्रतिम औदार्य आहे.

• • •

मक्का शहरात पैगंबर मुहम्मद (स.) आणि त्यांच्या अनुयायांचा छळ सुरूच होता. मात्र पैगंबरत्व कार्याचे वारे मदीना शहरात वाहत होते आणि तेथे इस्लामचा प्रचार होत होता. विरोधकांना मात्र हे सहन होणे शक्य नव्हते. त्यांनी पैगंबरांचा काटाच काढण्याचे ठरविले. पूर्ण विचार-विमर्श केल्यानंतर त्यांनी असे ठरविले की प्रत्येक कबिल्यातून एका तरुणाची निवड करायची आणि मग त्या सगळ्यांकडून पैगंबरांची हत्या करायची. यामुळे या हत्येत सर्वच कबिले सामील असल्यासारखे होईल आणि या सर्वच कबिल्यांचा सामना करण्याचे धैर्य पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कबिल्यास होणार नाही. ठरल्याप्रमाणे सर्वच कबिल्यातील योद्धे गोळा झाले आणि पैगंबरांच्या घराला घेराव घातला. पैगंबर सकाळी घराबाहेर पडताच सर्वांनी मिळून त्यांच्यावर हल्ला करायचे ठरले.

आणखीन एक लक्षणीय गोष्ट अशी की पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सत्यधर्मविरोधी शत्रूंनादेखील त्यांच्या ईमानदारी आणि प्रामाणिकतेवर जबरदस्त विश्वास होता. याच विश्वासामुळे बऱ्याच लोकांच्या आणि शत्रूंच्यासुद्धा ठेवी त्यांच्याकडे ठेवण्यात आलेल्या होत्या. एखाद्यास आपली एखादी वस्तू, जिन्नस, द्रव्य, संपत्ती सुरक्षित ठेवावी वाटत असल्यास तो बिनधास्तपणे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडे ठेवून निश्चिंत होत असे. अशाप्रकारे पैगंबरांकडे शत्रूंच्या बऱ्याच ठेवीदेखील सुरक्षिततेस्तव ठेवण्यात आलेल्या होत्या. पैगंबर मुहम्मद (स.) यांना शत्रुंच्या कटकारस्थानाची माहिती मिळाली होती. त्यांनी माननीय अली (रजि.) यांना बोलावले आणि सांगितले की मला मक्का शहर सोडून मदीना शहरी प्रस्थान करण्याचा ईशआदेश झाला आहे. मी आज मदीना शहरी प्रस्थान करणार आहे. तुम्ही माझ्या पलंगावर माझी चादर पांघरून झोपावे. सकाळ होताच लोकांच्या ठेवी त्यांना सोपवाव्यात.

विचार करण्याची गोष्ट आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांना ठार मारण्याकरिता येणाऱ्या शत्रूंच्या ठेवी परत करण्यात येताहेत. ज्या रात्री पैगंबरांना ठार करण्याचा बेत आखण्यात आला, त्या रात्री पैगंबरांनी त्यांच्या ठेवी परत करण्याची पूर्ण व्यवस्था केली. हा पैगंबरांचा त्यांच्या जीवावर बेतलेल्या शत्रुंशी व्यवहार होता. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दया आणि कृपेचा जो व्यवहार केला आणि ज्या धर्मपरायण आचरणाचे प्रदर्शन केले, त्याचे उदाहरण इतरच कोठेही सापडणे शक्य नाही.

• • •

विरोधकांच्या अमानुष छळाला कंटाळून केलेल्या मदीना प्रस्थानाच्या दहा वर्षांनंतर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मक्का शहरावर विजय मिळविला. ज्या विरोधकांनी पैगंबर आणि त्यांच्या अनुयायांचा अमानुषपणे छळ केला होता, त्यांचे जगणे कठीण केले होते, तीन वर्षांपर्यंतच्या सामाजिक व आर्थिक बहिष्कारांतर्गत ठेवून अन्न-पाण्यावाचून तडफडण्यासाठी सोडले होते, आज ते समस्त शत्रू पराजित होऊन थरथर कापत विजेता पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यासमोर उभे होते. मात्र फक्त मित्रांसाठीच नव्हे तर शत्रुंच्याप्रतिसुद्धा दया आणि कृपा असलेल्या पैगंबरांनी कोणत्याही प्रकारे रक्तपात केला नाही. किंचितही त्रास दिला नाही. सर्वांना माफ केले. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याविरुद्ध लढणाऱ्या आणि क्रूर व अमानुष पाषाणहृदयी शत्रूच्या लष्कराचे नेतृत्व करणाऱ्या अबू सुफियान (रजि.) यांना अभय दिले, मान दिला.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचा दयाळू व कृपाळू व्यवहार आणि महान चारित्र्याची या घटनेवरून कल्पना येते की पराजित झालेला शत्रूपक्ष त्यांच्या ताब्यात होता, भयाने थरथर कापत होता, त्यांच्याकडून कशा रीतीने बदला घेतला जाईल, हे सांगता येत नव्हते. मात्र पैगंबरांनी सर्वांना क्षमा केली, स्वतंत्र केले.

• • •

वहशी नावाचा एक व्यक्ती मक्का शहरात होता. यानेच पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या प्रिय काका हमजा (रजि.) यांचा वध केला होता. मक्का शहरावर पैगंबरांनी विजय मिळविल्यावर तो तेथून पळून गेला होता. त्यास वाटले होते की, पैगंबर त्यास क्षमा करणार नाहीत. मात्र जेव्हा त्यास पैगंबरांच्या शत्रूंच्या प्रति दया आणि कृपापूर्ण व्यवहाराची सूचना मिळाली, तेव्हा तो परत आला आणि पैगंबरदरबारी हजर झाला. पैगंबरांनी त्याला अभयदान दिले.

• • •

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी जीवनभर लढणाऱ्या शत्रूंच्या लष्कराचा आणि मक्का शहराचा सरदार अबू सुफियान याची 'हिंदा' नावाची पत्नी होती. ती पैगंबरांविषयी अतिशय वैरभाव बाळगत होती. याच वैरभावापोटी तिने पैगंबरांचे प्रिय काका हमजा (रजि.) यांच्या हत्येची वहशीला सुपारी दिली होती. हमजा (रजि.) यांचा वध झाल्यावर त्यांची छाती फाडून काळीज बाहेर काढून दातांनी चावले, त्यांच्या नाक-कानांचा हार गळ्यात घालण्याचे क्रौर्य दाखविले होते. मक्केवर पैगंबरांनी विजय प्राप्त केल्यावर तिने चेहऱ्यावर पडदा टाकला, जेणेकरून त्यांनी तिला ओळखू नये आणि सार्वजनिक क्षमादानात सामील होऊन जीव वाचवावा. मात्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तिला ओळखले. पैगंबरांनी काका हमजा (रजि.) यांच्या हत्येसंदर्भात मुळीच उल्लेख न करता तिलाही माफ करून दया आणि कृपेचे दर्शन घडविले. पैगंबरांच्या या व्यवहारामुळे तिला भयंकर आश्चर्य वाटले. ती खूप प्रभावित झाली आणि इस्लामचा स्वीकार केला.

• • •

सफवान-बिन-उमैया ही कुरैशजनांतील प्रमुख व्यक्ती होती. इस्लाम आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या कट्टर शत्रुंमध्ये त्याची गणना होत होती. यानेच उमैर-बिन-वहब यास मुहम्मद (स.) यांचा वध करण्यासाठी नियुक्त केले होते आणि बक्षीससुद्धा घोषित केले होते. मात्र पैगंबरांच्या मक्का विजयाची सूचना मिळताच त्याने

पळ काढला आणि जद्दाहला रवाना झाला. तेथून समुद्रमार्गाने तो यमनला जाण्याचा विचार करू लागला. उमैर-बिन-वहब याने पैगंबरांना सांगितले की सफवान-बिन-उमैया कबिल्याचा प्रमुख असून तो आपल्या भीतीने मक्का शहर सोडून पळून गेला आहे. यावर पैगंबरांनी त्यास अभयदान दिले. उमैर सरळ सफवान बिन उमैयास जाऊन भेटला आणि पैगंबरांच्या अभयदानाची खबर दिली. मात्र सफवानने सांगितले की "मला भीती वाटते. मी मुहम्मद (स.) यांना खूप छळल्याचे तुम्हाला माहीतच आहे. ते कसे काय मला क्षमा करतील?"

"अद्याप तुम्ही मुहम्मद (स.) यांना ओळखलेच नाही! तुम्ही त्यांची सहनशीलता आणि औदार्य अजून पाहिलेच नाही." उमैरने सगळा प्रकार समजावून सांगितला. सफवान-बिन-उमैया (रजि.) बरोबर पैगंबरांच्या सेवेत हजर झाले, म्हणाले, "आपण माझा गुन्हा माफ केला, मला अभयदान दिले, असे उमैरने सांगितले ते खरे आहे काय?" "होय! खरे आहे!" पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले.

"मला दोन महिन्यांची मुदत द्यावी," सफवानने विनंती केली. "मी तुम्हाला चार महिन्यांची मुदत देतो," पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले. यानंतर माननीय सफवान (रजि.) यांनी सहर्ष इस्लामचा स्वीकार केला.

याप्रमाणेच इस्लामचा कट्टर शत्रू असलेल्या अबू जहलचे पुत्र इक्रमा हे मक्केवर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या विजयानंतर यमनदेशी पळून गेले होते. त्यांच्या पत्नीने अगोदरच इस्लामचा स्वीकार केला होता. ती स्वत: यमनला जाऊन नवऱ्याला भेटली आणि पैगंबरांकडून क्षमादानाचे आश्वासन दिले. यानंतर दोघे नवरा-बायको पैगंबरदरबारी हजर झाले आणि माननीय इक्रमा (रजि.) यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांचा दयाळूपणा अनुभवला. पैगंबरांनी आपल्या कट्टर विरोधक आणि शत्रूच्या या पुत्रास उराशी कवटाळले आणि माननीय इक्रमा (रजि.) यांनी इस्लामचा स्वीकार केला.

• • •

अरब कबिल्यांपैकी बनीहनीफा हा कबिला इस्लाम आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या अगदी शेवटच्या क्षणापर्यंत विरोधक होता. सुमामा बिन अस्साल या कबिल्याचे प्रमुख होत. त्यांना मुस्लिमांनी अटक केली होती. पैगंबरांच्या आदेशाने त्यांना मस्जिदच्या खांबाला बांधून ठेवण्यात आले होते. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यास विचारले,

"कसे आहात 'सुमामा?"

"हे मुहम्मद (स.)! मी ठीक आहे. तुम्ही जर माझी हत्या केली तर समजा एका कबिल्याच्या सरदाराची हत्या होईल आणि जर जीवदान द्याल तर एका कृतज्ञ व्यक्तीवर उपकार होईल आणि धन पाहिजे असल्यास तेही मिळेल!"

सुमामांचे उत्तर ऐकून पैगंबर मुहम्मद (स.) तसेच निघून गेले. दुसऱ्या दिवशी...

"कसे आहात सुमामा?" पैगंबर मुहम्मद (स.) यांनी विचारले.

"मी तसाच आहे, जसा काल होतो! जर जीवदान द्याल तर एका कृतज्ञ व्यक्तीवर उपकार होईल आणि धनसुद्धा मिळेल!!"

पैगंबर मुहम्मद (स.) परत निघून गेले. यानंतर तिसऱ्यांदा पैगंबर त्यांच्याकडे आले आणि विचारपूस केली, त्यांनी परत तेच उत्तर दिले. यावेळी मात्र पैगंबरांनी त्यांना सोडून देण्याचे आदेश दिले. सुमामांना पैगंबरांकडून याच दयापूर्ण व्यवहाराची आशा होती. सुटका होताच त्यांनी जवळच्या एका बागेत जाऊन स्नान केले आणि पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यासमोर इस्लामचा सहर्ष स्वीकार केला आणि आपल्या भावना अशा शब्दांत व्यक्त केल्या.

"हे मुहम्मद (स.)! या अवघ्या धरतीवर तुमच्यापेक्षा जास्त अप्रिय व्यक्ती माझ्या दृष्टीत कोणीही नव्हती. मात्र आज तुम्हीच या समस्त जगामध्ये मला सर्वाधिक प्रिय आहात. ईश्वराची शपथ! पूर्वी तुमच्या धर्मापेक्षा वाईट धर्म माझ्या दृष्टीत कोणताही धर्म नव्हता, मात्र आज सर्वांत जास्त माझा आवडता धर्म 'इस्लाम' हाच आहे. ईश्वराची शपथ! समस्त जगात आज मला तुमचीच वसती प्रिय आहे!" पहिल्या दिवशी तर सुमामांना वाटले की त्यांची हत्या करण्यात येईल. मात्र त्यांनी जेव्हापैगंबर मुहम्मद (स.) यांना प्रत्यक्ष पाहिले तेव्हा त्यांची निराशा संपली आणि त्यांना मनापासून वाटले की पैगंबरांचा स्वभाव अत्यंत दयाळू आहे. म्हणूनच त्यांनी पैगंबरांशी बोलताना शालीन आणि सभ्य शब्दांचा वापर केला. जणू पैगंबरांचा हा चमत्कारच होता की त्यांच्या मृदू स्वभावामुळे त्यांचा विरोधक आणि वैरीसुद्धा त्यांचा मित्रच होत होता.

हुदैबियाच्या शस्त्रसंधीप्रसंगी माननीय अस्मा (रजि.) (पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या भार्या) यांची आई अद्याप मूर्तीपूजक होती. ती आपल्या मुलीकडे अर्थात अस्माकडे आली आणि आर्थिक मदत मागितली. माननीय अस्मा (रजि.) यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांना विचारले, "माझी आई अद्याप मुस्लिम झालेली नाही आणि तिला माझ्याकडून आर्थिक मदतीची गरज आहे, मी तिला मदत करणे योग्य ठरेल काय?"

यावर दयाळू आणि कृपाळू पैगंबरांनी सांगितले, ‘‘तिच्याशी दयापूर्ण व्यवहार करावा आणि शक्य होईल तेवढी मदत करावी!’’

• • •

माननीय अबू हुरैरा (रजि.) हे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे कट्टर अनुयायी आणि हदीस संग्रहक होते. मात्र त्यांची आई पैगंबरांना रोज शिव्या-शापांची लाखोली वाहायची. माननीय अबू हुरैरा (रजी.) यांना याचे खूप दुःख वाटायचे. त्यांनी पैगंबरांसमोर हा सगळा प्रकार ठेवला, पैगंबरांनी तिच्यावर राग न धरता तिच्यासाठी ईशदरबारी प्रार्थना केली आणि त्यांची ही प्रार्थना स्वीकार झाली. तिने इस्लामचा स्वीकार केला.

• • •

सातव्या हिजरी सनात ‘फिदक’वर विजय प्राप्त झाला. माननीय बिलाल (रजि.) हे पैगंबर मुहम्मद (स.) यांचे विशिष्ट निकटवर्तीय व्यक्ती आणि परिवाराचे प्रबंधक होते. पैसे नसल्यावेळी बाजारातून उसणे-पासणे सामान घेऊन येत आणि पैसे आल्यावर उधारी देऊन टाकीत असे. एकदा एक बिगरमुस्लिम व्यक्तीने त्यांना सांगितले, ‘‘तुम्हाला कर्ज हवे असल्यास माझ्याकडून घेत जा.’’

माननीय बिलाल (रजि.) यांनी त्याच्याकडून कर्ज घेतले. एके दिवशी तो बिलाल (रजि.) यांच्याकडे आला आणि तावातावाने म्हणाला,

‘‘ए काळ्या-कुट्ट माणसा! कर्ज परतफेडीच्या मुदतीसाठी फक्त चारच दिवस बाकी आहेत. तू परतफेड नाही केलीस तर तुला माझ्या शेळ्या चारवाव्या लागतील.’’ या प्रकाराने दुःखी होऊन बिलाल (रजि.) थेट पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यासमोर हजर झाले. सगळा प्रकार त्यांच्या समोर ठेवला. मात्र पैगंबरांनी त्या सावकाराच्या या दुष्टतापूर्ण व्यवहाराकडे दुर्लक्ष केले आणि त्याचे कर्ज देऊन टाकले.

• • •

नजरान शहरावरून ख्रिस्ती धर्मियांचे एक प्रतिनिधीमंडळ मदीना शहरी पैगंबर मुहम्मद (स.) यांना भेटण्यासाठी आले. पैगंबरांनी त्यांचा सत्कार केला आणि मस्जिदमध्ये त्यांच्या निवासाची व्यवस्था केली. एवढेच नव्हे तर त्यांना त्यांच्या धार्मिक रिती-रिवाजानुसार उपासनेची पूर्ण परवानगीसुद्धा दिली.

• • •

सत्यधर्माचा प्रचार करण्यासाठी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी ताईफ येथे दौरा केला. हा दौरा एक ऐतिहासिक घटना आहे. ताईफ येथील दौऱ्यावर असताना तेथील लोकांनी त्यांच्याबरोबर क्रूर आणि दुष्टतापूर्ण व्यवहार केला आणि त्यांच्यावर दगडांचा वर्षाव करून त्यांना रक्तबंबाळ केले, मात्र पैगंबरांनी त्यांना शाप न देता त्यांच्या हितातच ईशदरबारी प्रार्थना केली.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अवघे व्यक्तिमत्त्व म्हणजे ईशदेणगी असलेले दया आणि कृपेचे एक मूर्त स्वरूपच होते. त्यांच्या अवघ्या जीवनात त्यांच्याकडून कोणासही काय अगदी त्यांच्या प्राणांवर बेतलेल्या शत्रुंनासुद्धा दया आणि कृपा मिळाली. आणि हेच कारण आहे की पैगंबरांच्या याच दयाळू व कृपाळू स्वभावामुळे या जगात इस्लामचा प्रचार व प्रसार झाला.

• • •